# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. रामगोंडा मल्लाप्पा बसर्गी,<br>मु. पो. सिध्दनाथ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रामगोंडा मल्लाप्पा बसर्गी, मु. पो. सिध्दनाथ, ता. जत, जि. सांगली वितरण कंपनीकउे आपल्या शेतीपंपास विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. २९.४.२००४ रोजी अर्ज केला व एकत्रित रक्कम य. ११४७०/– पावती क्र. ३२६५५१३ ने अनामत रक्कम भरली. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार विद्युत पुरवठा एसपीए–११६३२५/२०४/२००३–०४ नुसार मंजूर झाला आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे क्ष फॉर्ममध्ये दि. ३०.११.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली.

कक्षाने आदेश न केल्याने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ११.२.२०१० रोजी दाखल केली. त्यामध्ये कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विद्युत जोडणी मिळावी अथवा विलंबाबद्दल भरपाई मिळावी. तसेच तक्रारदाराकडून तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे भरुन घेतलेली एकूण रक्कम परत मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३१.३.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी कनेक्शनसाठी दि. ६.९.२००९ रोजी अर्ज दिला, त्यांचे जागेची पाहणी दि. २४.२.२०१० ला केली असतांना असे दिसून आले की, त्यांनी संच मांडणी केलेली नाही. संच मांडणी केल्यानंतर व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वीज जोडणी देण्यात येईल. एन्ड पोलचे पैंसे तक्रारदारास परत करण्यात येतील परंतु मिटरची किंमत, कपॅसिटर टेस्टींग फी, करारपत्र फी ही शेड्यूल ऑफ चार्जेसच्या अगोदर भरण्यात आली असल्याने ती परत करता येणार नाही.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ५.४.२०१० रोजी घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महंकाळ विभाग उपस्थित. तक्रारदार प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, एस.ओ.पी. पूर्वीच्या जुन्या नियमानुसार वीज पुरवठ्याच्या अटीनुसार ६०० मिटरपेक्षा जास्त लाईनसाठी रु. ५,५००/–, रु. १५/– प्रति मीटर प्रमाणे रु. ४५००/– व एन्ड पोलचे रु. १०००/– व इतर डिपॉझीट तक्रारदाराने वि.प.कडे भरले आहे, तथापि अद्याप वीज कनेक्शन देण्यात आले नाही. मा. विद्युत नियामक आयोगाचे केस क्र. ७०/२००५ च्या आदेशानुसार शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे ग्राहकाकडून वि.प.ने कोणताही आकार घेवून नये, त्यामुळे मिटरची किंमत रु. २२५०/–, रु. १००/– कपॅसिटर टेस्टींग फी, रु. २०/– करारापत्र व पूर्वीचे भरुन घेतलेले रु. ५५००/– परत मिळावेत. आपल्या म्हणण्यापृष्टयर्थ त्यांनी औरंगाबाद ग्राहक तक्रार निवारण मंचकडील केस क्र. १४५/०८ दि. २०.१२.२००८ च्या निर्णयाचा दाखल मंचासमोर सादर केला व त्यात मंचाने Infrastrcuture should be borne by M.S.E.D.C.L. since connection is not yet released असे मत व्यक्त केले आहे.

या उलट, वितरण कंपनीतर्फे एन्ड पोलचे रु. १००/– देण्याची तयारी दर्शविली, परंतु इतर रक्कम दि. २०.१.२००५ पूर्वीच भरली असल्याने परत देता येणार नाही असे प्रतिपादन केले. तसेच ग्राहकाने संच मांडणी केल्यानंतर व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा देण्यात येईल असे म्हटले आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निष्कर्षासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांस तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे रक्कम परत मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर : होय

२) आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी सर्व रक्कम दि. २९.४.२००४ रोजी पावती क्र. ३२६५५१३ नुसार अनामतपोटी भरल्याचे वि.प.चे म्हणणे आहे. कृती मानके विनियमाची अंमलबजावणी दि. २०.१.२००५ पासून झाल्याने प्रस्तुतची रक्कम तक्रारदार यांस मिळणे प्रथमदर्शनी असंभवनीय वाटते. परंतु मा. लोकपाल, मुंबई यांचे केस क्र. ११/२००९ दि. २५.२.२००९ चे आदेश पहाता, कृती मानके विनियमातील तरतुदींची अंमलबजावणी दि. २०.१.२००५ पासून चालू झाली असली तरी, तक्रारदाराचा अर्ज हा योग्य ती फी भरुन प्रलंबित असल्याने कृती मानकाच्या तरतुदी लागू होतील.

श्री. अच्युत भा. पोटदुखे विरुध्द वितरण कंपनी या प्रकरणातील मा. लोकपाल यांचे आदेशातील कथनानुसार या केसमध्ये अर्जदाराने दि. २९.४.२००२ रोजी शेतीपंपास वीज जोडणी मिळणेसाठी अर्ज केला होता. २ वर्षानंतर डिमांड नोट दिली व त्या विलंबापोटी नुकसान भरपाई देण्यात आली आहे. परंतु कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार मिटरची किंमत एक रकमी बिलात समायोजित करुन द्यावी असे निरीक्षण केले. भारतीय विद्युत अधिनियम २००३ ( Indian Electricity Act 2003 ) मधील कलम ४३ व ४६ एकत्ररित्या वाचले असतां, वितरण कंपनी म्हणजेच लायसेन्सी यांची जबाबदारी आहे की त्यांनी ग्राहकास विद्युत पुरवठा देतांना electric plant or electric line या बाबत सेवा द्यावी, त्यासाठी मा. विद्युत नियामक आयोग अधिनियम (Regulation) करुन वितरण कंपनीला कांही रकमा वसूल करण्याचे अधिकार देवू शकते. तसेच मा. आयोग यांचे केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००६ चे आदेश विचारांत घेतले असता, मा. आयोगाने वि.प.चे सर्व्हीस लाईन चार्जेस वसूल करण्याचा प्रस्ताव (Infrastructure cost ) फेटाळला आहे, शिवाय डी.डी.एफ. ग्राहकांशिवाय अशी वसूली करता येणार नाही. तसेच केस क्र. ८२/२००६ व केस क्र. ५६/२००७ मध्येही अशाप्रकारचे आदेश आहेत, जेणेकरुन वितरण कंपनी ग्राहकांकडून (Infrastructure cost ) मागणी करु शकत नाही किंवा वसूल करु शकत नाही.

श्री. खापरे, ग्राहक प्रतिनिधी यांनी मा. ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचा केस क्र. १४५/०८ दि. २०.१२.२००८ मधील आदेश आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ सादर केला आहे. त्यात उल्लेख केल्याप्रमाणे वि.प.चे वरिष्ठ अधिकारी (Chief Engineer (Com.) यांनी दि.२०.५.२००८ रोजी परिपत्रक काढून मार्गदर्शक सूचना मा. विद्युत आयोगाचे आदेशानुसार केलेल्या आहेत. या परिपत्रकाच्या आधी वि.प.ने आपल्या फिल्ड ऑफीसरना ग्राहकांकडून फक्त शेड्यूल ऑफ चार्जेस मा. आयोगाने मान्य केल्याप्रमाणे घ्यावेत व ( Infrastructure ) हे कंपनीतर्फे उभे केले जाईल असे सूचित केले आहे. त्यामुळे प्रस्तुत तक्रारदार हा रु. ४५००/-, मिटरची किंमत रु. २२५०/-, करारपत्र रु. २०/-, कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/- हे वितरण कंपनीकडून परत मिळण्यास पात्र आहेत. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात एंड पोल कॉस्ट रु. १०००/- परत देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे तक्रारदार एकूण रु. ४५००+१००० = रु. ५५००/-, मिटरची किंमत रु. २२५०/- व इतर खर्च रु. १२०/- मिळण्यास पात्र आहे.

तक्रारदार यांनी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वीज जोडणी मिळण्याचे आदेश मिळावेत अन्यथा विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी दुसरी मागणी केली आहे. त्या बाबत वि.प.ने दि. २४.२.२०१० रोजी जागेची तपासणी केली असतां, ग्राहकाने संच मांडली केलेली नव्हती. संच मांडणी केल्यानंतर व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा देण्यात येईल असे वि.प.ने म्हटले आहे. मा. विद्युत नियामक आयोग केस क्र. ७४/२००७ मधील दि. ३.३.२००८ च्या आदेशानुसार दिनांक १७.५.२००७ मधील पुनरनिरीक्षण आदेशाच्या पॅरेग्राफ ५ प्रमाणे हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची परतफेड ३ सलग बिलातून समायोजित करण्यात यावी असे म्हटले आहे.

सदरची तक्रार मंचामध्ये दि. ११.२.२०१० रोजी दाखल करण्यात आली. दि. ५.४.२०१० ला सुनावणी घेण्यात आली. मंचासमोर केस क्र. ५९ -६०/२०१० व ६१/२०१० या मधील न्याय निर्णयास बराच वेळ लागल्याने व इतरही चलनाच्या प्रकरणातील न्याय निर्णय करावयाचे असल्यामुळे सदर तक्रार २ महिन्याच्या मुदतीत निकाली काढण्यात आली नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराच्या मागणीनुसार मिटरची किंमत रु. २२५०/–, कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/–, करारपत्र रु. २०/– असे एकूण रु.२३७०/– एक रकमी रोखीने तक्रारदार यांना वि.प.ने द्यावेत. इतर दोन रकमांचे एकूण रु. ५५००/– तीन सलग वीज बिलातून समायोजित करावेत.

३) तक्रारदारास कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार संच मांडणी करुन कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वि.प.ने प्राधान्यक्रमानुसार शेतीपंप विद्युत पुरवठा जोडणी द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

5) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :